महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे - ४११००५
Email id :mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/माप्रवि/१०३०
दिनांक : १९/०५/२०२०

# आदेश

**विषय :-** कोरोना विषाणुमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण-पुणे महापालिका क्षेत्रासाठी सुधारित आदेश व सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना.

**संदर्भ :-**
१) कोविड-१९,प्रतिबंधात्मक उपाययोजनांकरिता सुधारित एकत्रित मार्गदर्शक सूचना आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1, दि.१७.०४.२०२०, दि.१९.०५.२०२०
२) अधिसुचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई, क्र.करोना २०२०/प्र.क्र५८/ आरोग्य ५, दि.१४ मार्च २०२०
३) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
४) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
५) मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे आदेश, जा.क्र. मआ/माप्रवि/४९९, दि.०३/०५/२०२०
६) पुणे महापालिका क्षेत्रामधील दुकानांच्या वेळा निश्चित करणेबाबतचे मा.आयुक्त पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र. मआ/साप्रवि/६०६, दि..०६ /०५/२०२०
७) बिगर अत्यावश्यक सेवेची दुकाने पुणे महानगरपालिका क्षेत्रात उघडताना घ्यावयाची दक्षता बाबत मा.आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र. मआ/साप्रवि/६२०, दि.०६ /०५/२०२०
८) पुणे महापालिका क्षेत्रामधील प्रतिबंधित क्षेत्रातील जीवनावश्यक सेवांचा पुरवठा करणारे दुकाने बंद ठेवणेबाबत. मा.आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र. मआ/साप्रवि/७३५, दि.१० /०५/२०२०
९) प्रतिबंधित क्षेत्राच्या बाहेरील (Non Containment Zone) क्षेत्रामध्ये आणखी काही व्यवसाय सुरु करणेबाबत मा.आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र. मआ/साप्रवि/८८५, दि. १२ /०५/२०२०.

ज्याअर्थी राज्य शासनाने संदर्भ क्र. १ अन्वये कोरोना विषयक उपाययोजना संदर्भात लॉकडाऊन बाबतच्या सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गत केल्या आहेत. त्याअनुषंगाने वरील संदर्भ क्र. ६ ते ९ निष्कासित करून **मी, शेखर गायकवाड, आयुक्त, पुणे महानगरपालिका, मला**

भारतीय साथ रोग अधिनियमानुसार प्राप्त झालेल्या अधिकारान्वये खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गत करीत आहे.

अ) नागरिकांच्या सुरक्षितते संबंधीचे उपाय :

१) महानगरपलिका हद्दीमध्ये कोणत्याही व्यक्तीस अत्यावश्यक कारण/ सेवा वगळता संध्याकाळी ०७.०० ते सकाळी ०७.०० वाजेपर्यंत घराबाहेर जाता येणार नाही.

२) सर्व प्रकारच्या क्षेत्रामध्ये ६५ वयोगटा पेक्षा अधिक वय असलेल्या, आजारी व्यक्ती, गरोदर महिला, १० वर्षापेक्षा कमी वय असलेली मुले यांना अत्यावश्यक सेवा आणि आरोग्य विषयक अडचणी शिवाय घराबाहेर जाता येणार नाही.

३) प्रतिबंधित क्षेत्रामध्ये औषध विक्रीची दुकाने, बाह्य रुग्णसेवा आणि दवाखाने सुरु राहतील. मात्र याकरिता त्यांनी सुरक्षिततेचे निकष पाळणे आवश्यक राहील.

आज मंगळवार दि.१९.०५.२०२० मध्यरात्री १२ वाजेपासून पुढील आदेशापर्यंत, पुणे महापलिका हद्दी मधील केवळ सोबत जोडलेल्या अनुसूची–१ मधील **सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र** (Micro Containment Zone) हे संक्रमणशील क्षेत्र म्हणून जाहीर करीत आहे. अशा क्षेत्रात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**ब) प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone)**

१) संबंधित पोलीस स्टेशन प्रमुख आपल्या अनुसूची-१ मधील क्षेत्राच्या हद्दी प्रतिबंधित (सील) करतील.

२) त्यानुसार महापालिकेच्या प्रतिबंधित क्षेत्राच्या हद्दीमध्ये वैद्यकीय/आपत्कालीन सेवा, औषध विक्रीचे दुकाने व जीवनावश्यक वस्तूंच्या सेवा व पुरवठा सुरळीत राहण्याकरिता, या सेवा वगळता/ पुरवठा वगळता अन्य व्यक्ती यांना संबंधित प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) मध्ये प्रवेश करण्यास व परिसरातून बाहेर पडण्यास बंदी करण्यात येत आहे.

३) अ) प्रतिबंधित क्षेत्रामध्ये (Containment Zone) मध्ये दुध आणि भाजीपाला तसेच इतर अत्यावश्यक वस्तूचा पुरवठा जसे स्वयंपाकाचा गॅस, इ. पुणे महापालिका आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त मार्गदर्शनाखाली आणि स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन घरपोच किंवा या क्षेत्राच्या आत मोकळ्या जागेवर सुरक्षित अंतराचे पालन करून उपलब्ध करून देता येईल. सदर परिसरात जीवनावश्यक वस्तुंचा/ औषध विक्रीची दुकाने /अत्यावश्यक सेवा पुरविणारे कार्यालय/ व्यक्तींना व त्यांच्या वाहनांना यामधून वगळण्यात येत आहे.

ब) मनपाची अत्यावश्यक सेवा देणारी सर्व प्रकारची वाहने पाण्याचे टॅंकर, रुग्णवाहिका, शववाहिका, अग्निशमन दलाचे वाहन, कचरा वाहतूक गाडी व त्यावरील कर्मचारी,

अत्यावश्यक सेवा देणारे कर्मचारी/ अधिकारी यांना प्रतिबंधात क्षेत्रामध्ये केव्हाही प्रवेश करता येईल. त्याकरिता कोणत्याही पासची आवश्यकता राहणार नाही.

**क) प्रतिबंधित क्षेत्राबाहेर ( Outside Containment Zone)**

प्रतिबंधित क्षेत्राबाहेर विशिष्ठ इमारती/गृह निर्माण सोसायटी येथे पॉझीटीव्ह रुग्णांची संख्या आढळल्यास अशी इमारत लगेच सील करता येईल,आणि पुढच्या आढाव्याच्या वेळी प्रतिबंधित क्षेत्रात समावेश करता येईल.

१) **प्रतिबंधित व्यवसाय** : प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) बाहेरील उर्वरित मनपा क्षेत्रामध्ये मॉल, स्वयंचलित रिक्षा/कॅब, वाहतूक करणाऱ्या बसेस, केशकर्तनालय/ब्युटी पार्लर, स्पा बंद राहतील.

२) **अत्यावश्यक उद्योग व व्यवसाय** : सर्व प्रकारचे दवाखाने, इस्पितळे, औषध विक्रीची दुकाने ; अत्यावश्यक वस्तूंचे उत्पादन करणारे व्यवसाय यात औषधी, वैद्यकीय उपकरणे व त्यांना लागणारा कच्चा माल, इ. ; तसेच ज्याठिकाणी वस्तूचे उत्पादन करणेसाठी कामामध्ये सातत्य ठेवावे लागते अश्या बाबी ; माहिती व तंत्रज्ञान विषयक हार्डवेअरची निर्मिती तसेच पॅकेजिंग करिता लागणाऱ्या वस्तूंची निर्मिती, अन्न प्रक्रिया उद्योग जसे ब्रेड उत्पादक कारखाना, दुध प्रक्रिया केंद्र, पिठाची गिरणी, दालमिल या ठिकाणी कामगारांच्या कामाच्या वेळा निश्चित करून व त्यांच्या सुरक्षित अंतर ठेवून करता येऊ शकते.

३) **घरकाम करणाऱ्या व्यक्ती** : प्रतिबंधित क्षेत्राच्या बाहेर राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या घरी, घर मालकाची इच्छा असल्यास स्वेच्छेने काम करता येईल. तथापि, प्रतिबंधित क्षेत्रात राहणाऱ्या व्यक्तींना प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील ठिकाणी घरकाम करण्यास मनाई करण्यात येत आहे. तसेच कोरोना प्रतिबंधक संदर्भात योग्य ती दक्षता घेण्यात यावी.

४) **ज्येष्ठ नागरिक** : ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या मदतीकरिता लागणाऱ्या व्यक्ती, रुग्णसेवेसाठी मदतनीस व्यक्ती, हेल्पर, घरकाम करणारी व्यक्ती, वाहनचालक, इ. यांची मदत घेता येईल. तथापि, मदत करणारी अशी व्यक्ती ही प्रतिबंधित क्षेत्राच्या बाहेर राहणारी असावी तसेच या अनुषंगाने कोरोना प्रतिबंधक संदर्भात योग्य ती दक्षता घेण्यात यावी.

५) **शासकीय कार्यालय** :

**अ)** सर्व केंद्रीय शासकीय कार्यालयांमध्ये उपसचिव आणि समकक्ष व त्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचे सर्व अधिकारी कार्यालयात उपस्थित राहू शकतात तर त्यांच्या अन्य कर्मचा-यांच्या एकूण संख्येच्या ३३% कर्मचारी वापरून कार्यालये सुरु ठेवता येईल.

**ब)** राज्य शासनाची सर्व कार्यालये शासनाने विहित केलेल्या कर्मचारी मर्यादेत सुरु ठेवता येतील.

६) **वर्तमानपत्रे :** वर्तमानपत्राचे वितरण हे सकाळी ०७.०० ते १०.०० या वेळेमध्ये वर्तमानपत्रे घेणाऱ्या व्यक्तीच्या सहमतीने वितरीत करता येतील. मात्र याकरिता वितरण करणाऱ्या व्यक्तीने मास्कचा वापर आणि वेळोवेळी सॅनिटायझरचा वापर करणे आवश्यक राहील. तसेच, इलेक्ट्रॉनिक मिडीया, केबल सर्व्हिस सुरु राहतील.

७) **वित्तीय क्षेत्र :** रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि त्यांनी नियंत्रित केलेल्या आर्थिक संस्था या कमीत कमी कर्मचारी वापरून कामकाज सुरु ठेवू शकतील. तर ATM, बँका, सहकारी पतसंस्था, विमा कंपन्या यांची कार्यालये सुरु राहतील.

८) **ई-कॉमर्स:** ई-कॉमर्सच्या माध्यमातून घरपोच अत्यावश्यक वस्तूचे वितरण करता येईल. तसेच कुरिअर सेवा सुरु राहतील.

९) **वाहन वापर :** केवळ अनुज्ञेय कामांसाठी वैयक्तिक वाहन वापरता येईल. तथापि, चार चाकी वाहनामध्ये चालका व्यतिरिक्त दोन व्यक्तींना परवानगी असेल, तर दुचाकी वाहनात मागच्या सीटवर व्यक्तीला नेता येणार नाही.

१०) **माहिती तंत्रज्ञान :** माहिती तंत्रज्ञान विषयक काम करणारे व सेवा देणारे व्यवसाय त्यांच्या एकूण कर्मचाऱ्यांपैकी ५०% कर्मचाऱ्यांवर सुरु ठेवता येतील तसेच डाटा व कॉल सेंटर कमीत कमी कर्मचाऱ्यांचा वापर करून सुरु ठेवता येतील.

११) **खाद्य पदार्थांची सेवा :** खाद्य पदार्थांची पार्सल सेवा देणारे व्यवसाय सुरु ठेवता येतील.

१२) **बांधकाम विषयक :** प्रतिबंधित क्षेत्राबाहेर बाहेरील मजूर न आणता कामाच्या जागेवर (In Situ) मजुरांची राहण्याची व्यवस्था होत असेल तर अशी बांधकामे आणि अपारंपरिक उर्जा प्रकल्पांची कामे करता येतील. पुणे मनपाने ज्या पूर्व पावसाळी कामांना, मेट्रोच्या कामांना, धोकादायक इमारतीबाबत करावयाची कारवाई तसेच पूरपरिस्थिती होऊ नये म्हणून ज्या कामांना पूर्व परवानगी देण्यात आलेली आहे, अशी कामे सुरु राहतील.

१३) **पथारी व्यावसायिक :** खालील नमूद रस्त्यांशिवाय अधिकृत पथारी व्यावसायिक यांना दररोज खालील अटीवर सकाळी ०७.०० ते संध्याकाळी ०७.०० वाजेपर्यंत व्यवसाय करता येईल.
अ) २ पथारी व्यावसायिकांमध्ये अंतर १० मीटर ठेवावे व
ब) हातमोजे व मास्क घालून विक्री करता येईल.

- शिवाजी रोड - पुणे मनपा - डेगळे पुल - शनिवार वाडा ते जेधे चौक
- बाजीराव रोड - पुरम चौक - माडीवाले कॉलनी – शनिवार चौक – विश्रामबागवाडा - शनिवारवाडा.
- हडपसर - सोलापूर रोड - मगरपट्टा चौक ते गाडीतळ, गाडीतळ ते लक्ष्मी कॉलनी चौक ते शेवाळवाडी टोलनाका ते पुणे शहर हद्द पर्यंत तसेच गाडीतळ ते फुरसंगी सासवड रोडने पुणे शहर हद्दपर्यंत.

- सातारा रोड – जेधे चौक - लक्ष्मीनारायण थिएटर, सिटी प्राईड, विवेकानंद पुतळा, धनकवडी फ्लाय ओव्हर ते कात्रज चौक, कात्रज चौक ते सातारा रोडने पुणे शहर हद्दपर्यंत.
- नगर रोड - येरवडा पर्णकुटी, गुंजन चौक, विमाननगर, वडगावशेरी, खराडी बायपास चौक ते वाघोली, तैलाची मोरी पुणे शहर हद्दपर्यंत.
- एअरपोर्ट रोड - गुंजन चौक - गोल्फ क्लब रोड - येरवडा पोस्ट ऑफिस - नागपुर चाळ - जैलरोड पौलीस चौकी - संजय पार्क - ५०९ चौक – एअरपोर्ट.
- सिंहगड रोड - दांडेकर पुल - पानमळा - रोहन कृतिका लगत, नाकोडा नगर – राजाराम पूल– विठ्ठलवाडी फुटपाथ - संतोष हॉल – आनंदनगर, माणिकबाग – वडगाव धायरी उड्डाणपुल, धायरी फाटा -धायरी शेवटचा बसस्टॉप.
- पौड रोड- खंडोजी बाबा चौक - स्वातंत्र्य चौक - नळ स्टॉप- कर्वेरस्ता फ्लायओव्हर- आनंदनगर- शास्त्री नगरकोथरुड बस डेपो- चांदणी चौक.
- जंगली महाराज रोड- संचेती चौक- झाशी राणी चौक-डेक्कन जिमखाना-संभाजी पुतळा - खंडोजी बाबा चौक.
- एफ.सी. रोड - खंडोजी बाबा चौक – गुडलक चौक - वैशाली हॉटेल - फर्गुसन कॉलेज- संत ज्ञानेश्वर पादुका चौक- शिवाजीनगर पोलीस स्टेशन.
- गणेशखिंड रोड-शिमला चौक - म्हसोबा चौक - सेंट्रल मॉल – शासकीय तंत्रनिकेतन- विद्यापीठ चौक- राजभवन- इदिरा गांधी झोपडपट्टी- राजीव गांधी पूल औंध- पुणे शहर हद्दपर्यंत.

१५) **सुरक्षा व सेवा व्यवस्था** : रहिवासी संकुल व कार्यालयांना व्यवस्थित ठेवण्यासाठी लागणाऱ्या सेवा व सुरक्षा पुरविणाऱ्या खाजगी संस्था सुरु राहतील .

१६) **दुकाने :**

प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) बाहेरील उर्वरित मनपा क्षेत्रामध्ये सर्व प्रकारचे मॉल बंद राहतील तथापी, व्यापारी संकुलामधील केवळ अत्यावश्यक वस्तूंची दुकाने सुरु राहतील. तसेच पुणे मनपा क्षेत्रातील प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील रस्त्यावरील स्वतंत्र दुकाने, रहिवाशी कॉलनीतील दुकाने व रहिवाशी संकुलातील दुकाने उघडी राहतील. तथापि, पुणे मनपा क्षेत्रातील एखाद्या रस्त्यावर पाच (५) पेक्षा जास्त दुकाने असतील, तर अश्या रस्त्यावरील अत्यावश्यक सेवेची सर्व दुकाने व अत्यावश्यक सेवा नसलेली जास्तीत जास्त पाच (५) बिगर अत्यावश्यक दुकानांना आणि राज्य शासनाने अनुज्ञेय केलेला व्यवसायांना परवानगी राहील.

| अ.क्र. | वस्तू विक्रीसाठी निश्चित केलेले दिवस | व्यवसायाचा प्रकार |
|---|---|---|
| १ | सोमवार | इलेक्ट्रॉनिक साधने, संगणकीय अनुषंगिक साहित्य साधने सामुग्री व मोबाईल विक्री व दुरूस्ती इंलेक्ट्रीक वस्तु विक्री व दुरूस्ती,भांड्याची विक्री दुकाने, ईस्त्री व लॉड्री दुकान, स्टेशनरी दुकान, वैद्यकीय साहित्य तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्चा मालाचे पुरवठा करणारे व्यवसाय, कपडे शिलाईचे दुकान, फोटोस्टुडीओ, फोटोफ्रेमची दुकाने, सोने चांदी व इतर मौल्यवान धातू विक्रीची दुकाने, चष्मा विक्रीची दुकाने;शेतीविषयक सर्व बाबींची दुकाने(जसे- अवजारे,बियाणे,खते,जंतुनाशके, ई); पावसा पासून संरक्षणासाठी जसे रेनकोट,छत्र्या,प्लास्टिक शिट्,ई .विक्रीची दुकाने. |
| २ | मंगळवार | सायकल विक्री/दुरुस्ती, सर्व प्रकारचे स्वयंचलित वाहन विक्री, वाहनांचे दुरूस्ती गॅरेज , हार्डवेअर, प्लंबिग,बांधकाम साहित्य साधन सामुग्री, कपडयांची दुकाने, डेअरी उत्पादने वाहन दुरूस्तीचे साहित्य विक्री, गृह उपयोगी सामुग्री, सोने चांदी व इतर मौल्यवान धातू विक्रीची दुकाने, पूजा साहित्य विक्री, तयार फर्निचरची विक्री; शेतीविषयक सर्व बाबींची दुकाने(जसे- अवजारे,बियाणे,खते,जंतुनाशके, पी,व्ही.सी.पाईप, ठिबक सिंचन ई). |
| ३ | बुधवार | इलेक्ट्रॉनिक साधने, संगणकीय अनुषंगिक साहित्य साधने सामुग्री व मोबाईल विक्री व दुरूस्ती इंलेक्ट्रीक वस्तु विक्री व दुरूस्ती,भांड्याची विक्री दुकाने, ईस्त्री व लॉड्री दुकान, फूट वेअर, स्टेशनरी दुकान, वैद्यकीय साहित्य तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्चा मालाचे पुरवठा करणारे व्यवसाय, कपडे शिलाईचे दुकान, फोटोस्टुडीओ, फोटोफ्रेमची दुकाने, सोने चांदी व इतर मौल्यवान धातू विक्रीची दुकाने, चष्मा विक्रीची दुकाने |
| ४ | गुरुवार | सायकल विक्री/दुरुस्ती, सर्व प्रकारचे स्वयंचलित वाहन विक्री, वाहनांचे दुरूस्ती गॅरेज , हार्डवेअर, प्लंबिग,बांधकाम साहित्य साधन सामुग्री, कपडयांची दुकाने, डेअरी उत्पादने, वाहन दुरूस्तीचे साहित्य विक्री, गृह उपयोगी सामुग्री, स्टेशनरी दुकान, तयार फर्निचरची विक्री, फोटोस्टुडीओ, फोटोफ्रेमची दुकाने, पूजा साहित्य विक्री, सोने चांदी व इतर मौल्यवान धातू विक्रीची दुकाने, चष्मा विक्रीची दुकाने पावसा पासून संरक्षणासाठी जसे रेनकोट,छत्र्या,प्लास्टिक शिट्,ई .विक्रीची दुकाने. |
| ५ | शुक्रवार | इलेक्ट्रॉनिक साधने, संगणकीय अनुषंगिक साहित्य साधने सामुग्री व मोबाईल विक्री व दुरूस्ती इंलेक्ट्रीक वस्तु विक्री व दुरूस्ती,भांड्याची विक्री दुकाने,ईस्त्री व लॉड्री दुकान, फूट वेअर, बांधकाम साहित्य विक्री, वैद्यकीय साहित्य तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्चा मालाचे पुरवठा करणारे व्यवसाय, कपडे शिलाईचे दुकान; शेतीविषयक सर्व बाबींची दुकाने(जसे- अवजारे,बियाणे,खते,जंतुनाशके, पी,व्ही.सी.पाईप, ठिबक सिंचन ई). माल वाहतूक कंपन्यांची गोदामे. |

| अ.क्र. | वस्तू विक्रीसाठी निश्चित केलेले दिवस | व्यवसायाचा प्रकार |
|---|---|---|
| ६ | शनिवार | सायकल विक्री/दुरुस्ती, सर्व प्रकारचे स्वयंचलित वाहन विक्री, वाहनांचे दुरूस्ती गॅरेज , हार्डवेअर, प्लंबिग,बांधकाम साहित्य साधन सामुग्री, कपडयांची दुकाने, डेअरी उत्पादने वाहन दुरूस्तीचे साहित्य विक्री, गृह उपयोगी सामुग्री, फोटोस्टुडीओ, फोटोफ्रेमची दुकाने, ईस्त्री व लॉड्री दुकान, बांधकाम साहित्य विक्री, पूजा साहित्य विक्री, सोने चांदी व इतर मौल्यवान धातू विक्रीची दुकाने, तयार फर्निचरची विक्री; शेतीविषयक सर्व बाबींची दुकाने(जसे- अवजारे,बियाणे,खते,जंतुनाशके, पी,व्ही.सी.पाईप, ठिबक सिंचन ई). माल वाहतूक कंपन्यांची गोदामे. पावसा पासून संरक्षणासाठी जसे रेनकोट,छत्र्या,प्लास्टिक शिट्,ई .विक्रीची दुकाने. |
| ७ | रविवार | सायकल विक्री/दुरुस्ती, सर्व प्रकारचे स्वयंचलित वाहन विक्री, वाहनांचे दुरूस्ती गॅरेज , हार्डवेअर, प्लंबिग,बांधकाम साहित्य साधन सामुग्री, कपडयांची दुकाने, डेअरी उत्पादने, वाहन दुरूस्तीचे साहित्य विक्री, गृह उपयोगी सामुग्री, स्टेशनरी दुकान, फूट वेअर, बांधकाम साहित्य विक्री, कपडे शिलाईचे दुकान;शेतीविषयक सर्व बाबींची दुकाने(जसे- अवजारे,बियाणे,खते,जंतुनाशके, पी,व्ही.सी.पाईप, ठिबक सिंचन ई). माल वाहतूक कंपन्यांची गोदामे. पावसा पासून संरक्षणासाठी जसे रेनकोट,छत्र्या,प्लास्टिक शिट्,ई .विक्रीची दुकाने. |

**दुकाने सुरु करताना घ्यावयाची दक्षता : सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे राहतील व याप्रमाणे दुकानदारांना दक्षता घेता येईल.**

१) व्यवसाय धारकाने दुकानाची वेळ निश्चित केल्याप्रमाणे म्हणजे सकाळी ०७.०० ते संध्या. ०७.०० वाजेपर्यंत ठेवावी.

२) व्यवसाय धारक आणि व्यवसायात काम करणारे कर्मचारी हे प्रतिबंधित क्षेत्राच्या बाहेरील भागात राहणारे असणे आवश्यक आहे.

३) दुकानदारांनी कामगारांना फोटोसह ओळखपत्र द्यावे.

४) दुकानामध्ये काम करताना दोन कर्मचाऱ्यांमध्ये सुरक्षित अंतर ठेवावे.

५) दुकानात काम करण्याऱ्या सर्व व्यक्तींनी मास्क आणि हातमोजे (Hand gloves) वापरावे.

६) दुकानात काम करण्याऱ्या कर्मचा-यांना कोणतीही आजाराची लक्षणे दिसल्यास तात्काळ मनपा दवाखान्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सल्ला घेऊन त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

७) कर्मचा-यांना हात वेळोवेळी स्वच्छ धुण्यासाठी साबण/सॅनिटायझरची व्यवस्था करावी व आवश्यक ती सुविधा उपलब्ध करून द्यावी.

८) दुकानामध्ये शिरताना पायऱ्या आणि बाहेरील भाग १% सोडियम हायपो क्लोराइट द्रावणाने दररोज फवारणी करून घ्यावी.

९) दुकानाचे काउंटर गिऱ्हाईक सोडून गेल्यानंतर १% सोडियम हायपो क्लोराइट द्रावणाने पुसून घ्यावी.

१०)दुकानात खरेदी करण्यासाठी आलेल्या नागरिकाने देखील मास्क घालणे आवश्यक आहे.

११) दुकानामध्ये वस्तू खरेदीसाठी गर्दी होऊ नये व सुरक्षित अंतर राहावे म्हणून नागरिकांना उभे राहण्याच्या जागेवर ६ फुट अंतराच्या खुणा करून ठेवाव्यात.

**इ) सार्वजनिक ठिकाणी घ्यावयाची काळजी :**

१) सर्व नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी मास्क वापरणे आवश्यक आहे.

२) सार्वजनिक ठिकाणांचे व्यवस्थापन ज्यांच्या नियंत्रणाखाली आहे अश्या व्यक्तींनी नागरिकांमध्ये सुरक्षित अंतर राहील याची दक्षता घ्यावी.

३) कुठल्रीही संघटना/व्यवस्थापक सार्वजनिक ठिकाणी ५ किंवा अधिक व्यक्ती एकत्रित येऊ देणार नाहीत.

४) लग्न समारंभासारख्या कार्यक्रमात जास्तीत जास्त ५० पाहुणे/व्यक्ती एकत्र येऊ शकतात. मात्र या ठिकाणी देखील वावरताना सुरक्षित अंतर ठेवणे आवश्यक राहील.

५) अंत्यसंस्कार व अनुषंगिक कार्यक्रमास जास्तीत जास्त २० व्यक्ती एकत्र येऊ शकतात. मात्र या ठिकाणी देखील वावरताना सुरक्षित अंतर ठेवणे आवश्यक राहील.

६) सार्वजनिक ठिकाणी थुंकणे हा देखील दंडनीय अपराध आहे.

७) पान, तंबाखू, मद्य, इ. चे सार्वजनिक ठिकाणी सेवन करता येणार नाही.

८) मद्यविक्रीच्या दुकानात २ व्यक्तीमधील अंतर किमान ६ फुट इतके राहील. तर एकावेळी जास्तीत जास्त ५ व्यक्ती हजर राहू शकतील. यावर राज्य उत्पादन शुल्क विभाग यांची देखरेख राहील.

**फ) कामाच्या ठिकाणी घ्यावयाची काळजी :**

१) कामाच्या ठिकाणी सर्वांना मास्क उपलब्ध करून दिले पाहिजेत व ते सर्वांनी वापरणे आवश्यक आहे.

२) कामाच्या ठिकाणी सुरक्षित अंतर सर्व कर्मचा-यांमध्ये राहणे आवश्यक आहे.

३) कर्मचा-यांमध्ये सुरक्षित अंतर राहण्याच्या दृष्टीने २ शिफ्टमध्ये पुरसे अंतर व जेवणाच्या वेळा देखील निश्चित करून द्याव्यात .

४) कामाच्या ठिकाणी येणाच्या व जाण्याच्या ठिकाणी त्यांचे शरीराचे तापमान घेण्यासाठी थर्मल स्कॅनिंग, हॅन्ड वॉश, सॅनिटायझर (स्पर्श विरहीत) ची व्यवस्था असावी तसेच कामाच्या ठिकाणी पुरेश्या प्रमाणात हॅन्ड वॉश व सॅनिटायझर उपलब्ध असावे.

५) कामाच्या ठिकाणाची, सार्वजनिक वापरावयाच्या जागा आणि अन्य सर्व ठिकाणी ज्या भागाला व्यक्तीचा स्पर्श होतो. जसे दरवाजाची कडी, इ. याची स्वच्छता वारंवार होणे आवश्यक आहे.

६) **आरोग्य सेतू** नावाचे ॲप सर्व कर्मचा-यांनी वापरणाचे बंधन करणे याची जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील.

७) कर्मचा-यांच्या मोठ्या उपस्थिती असलेल्या बैठका घेण्यात येऊ नये.

८) कामाच्या ठिकाणी कोविड-१९ वर उपचार होणाऱ्या मनपाच्या दवाखान्यांची यादी लावणे आवश्यक आहे.

९) कोणत्याही कर्मचा-यास कोविडची लक्षणे दिसल्यास त्यास तात्काळ तपासणीसाठी नेण्यात यावे. वैद्यकीय तपासणीस घेऊन जाईपर्यंत अश्या कर्मचा-यास स्वतंत्र ठेवण्याकरिता जागा निश्चित करून ठेवावी.

१०) सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नसेल त्यावेळेस कर्मचा-यांच्या सुरक्षित अंतर ठेवून वाहतुकीसाठी वाहनाची व्यवस्था करावी.

११) चांगल्या प्रकारची स्वच्छता कशाप्रकारे ठेवावी याबाबत कर्मचा-यांना प्रशिक्षण आणि सतत संपर्क ठेवला पाहिजे.

१२) काम करीत असलेल्या व्यक्ती या केवळ प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील (Outside Containment Zone) राहणाऱ्या असणे आवश्यक आहे.

हा आदेश आज मंगळवार, दिनांक १९ मे २०२० रोजी माझ्या सही शिक्याने दिला आहे.

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF POONA पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन सन–१९५० EST. 1950

(शेखर गायकवाड )
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका, पुणे

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.

३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.

यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित

| अनुसूची १ |
|---|
| पुणे महानगरपालिकेतील सूक्ष्मप्रतिबंधित क्षेत्र (Micro Containment Zone) |
| टिप :- नव्याने समाविष्ट सूक्ष्मप्रतिबंधित क्षेत्र हे ``ठळक अक्षरामध्ये " (bold type) दर्शविले आहे. |

| अ.क्र | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नांव | मनपा क्षेत्रीय कार्यालय | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| 1 | मंगळवार पेठ, जुना बाजार | कसबा - विश्रामबागवाडा | जुनाबाजार- मंगळवार पेठ- जुना बाजार परिसर ( फायनल प्लॉट क्र ८९७, ८९८) |
| 2 | पर्वतीदर्शन परिसर १ | कसबा - विश्रामबागवाडा | वेलणकरनगर, लक्ष्मीनारायण थिएटर, पर्वती दर्शन, एस.टी कॉलनी, हॉटेल पंचमी परिसर |
| 3 | पर्वतीदर्शन परिसर २ | कसबा - विश्रामबागवाडा | रामभाऊ म्हाळगी रस्त्याच्या पश्चिमेकडील पर्वतीदर्शन वसाहत |
| 4 | पर्वती दांडेकर पूल झोपडपट्टी | कसबा - विश्रामबागवाडा | दांडेकर पूल वसाहत फायनल प्लॉट क्रमाक १A, २A, २B, २८, ५८५, ५८७, ५८७  पैकी आंबील ओढा कॉलनी परिसर |
| 5 | पर्वती दत्तवाडी | कसबा - विश्रामबागवाडा | पर्वती फायनल प्लॉट क्रमांक ५५८ दत्तवाडी परिसर |
| 6 | शहर मध्यवर्ती भाग कसबा, नाना, भवानी पेठ | भवानी पेठ, कसबा - विश्रामबागवाडा, **ढोले पाटील रोड** | कसबा, विश्रामबागवाडा, भवानी पेठ- सोमवार पेठ, मगळवार पेठ, बुधवार पेठ (पै), गुरुवार पेठ, शुक्रवार पेठ(पै), रविवार पेठ, रास्ता पेठ, नाना पेठ, भवानी पेठ, महात्मा फुले पेठ (गंज पेठ), गणेश पेठ, कसबा पेठ, घोरपडी पेठ. |
| 7 | पुणे स्टेशन, ताडीवाला रोड | ढोले पाटील रोड | स्वीपर चाळ, भीम संघटना राजरतन, विश्वदीप तरुण मित्रमंडळ, मारुती मंदीर -1, बाल मित्रमंडळ, मारुती मंदीर-2, दुष्काळ वसाहत, संगीता वसाहत, कपिला डेअरी परिसर, लोकसेवा मित्रमंडळ उल्हासनगर, खड्डा वसाहत, लोकसेवा वसाहत, चव्हाण चाळ, पानमळा प्रायव्हेट रोड, इंदिरानगर प्रायव्हेट रोड, विकासनगर, सिध्दार्थनगर प्रायव्हेट रोड, किनारा नालंदा प्रायव्हेट रोड, पत्र्याची चाळ प्रायव्हेट रोड, ताडीवाला रोड |
| 8 | **भवानी पेठ, मंजुळाबाई चाळ** | **ढोले पाटील रोड** | **मंजुळाबाई चाळ - सि.स.नं. 778, 786, 787 भवानी पेठ** |
| 9 | पर्वती, तळजाई वस्ती 1 | धनकवडी - सहकारनगर | गोळवलकर गुरुजी पथाचे पश्चिमेकडील तळजाई वसाहत |

| अ.क्र | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नांव | मनपा क्षेत्रीय कार्यालय | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| 10 | पर्वती, तळजाई वस्ती 2 | धनकवडी - सहकारनगर | सुवर्ण सोसायटी, रमाबाई आंबेडकर सोसायटी, रोहिदास सोसायटी, वीर लहुजी सोसायटी, स्वप्नसाकार सोसायटी परिसर |
| 11 | पर्वती शिवदर्शन 1 | धनकवडी - सहकारनगर | रामभाऊ म्हाळगी पथाचे पश्चिमेकडील वसाहत |
| 12 | पर्वती शिवदर्शन 2 | धनकवडी - सहकारनगर | रामभाऊ म्हाळगी पथाचे पूर्वेकडील वसाहत |
| 13 | पर्वती, शाहु वसाहत | धनकवडी - सहकारनगर | पर्वती, शाहु वसाहत, गजानन महाराज मंदिरासमोरील परिसर |
| 14 | कात्रज, सुंधामातानगर लगतचा भाग | धनकवडी - सहकारनगर | कात्रज, स.नं. 66(पै) सुंधामातानगर लगतचा परिसर |
| 15 | आंबेगाव पठार, सिध्दीविनायक कॉलनी, नवनाथनगर | धनकवडी - सहकारनगर | आंबेगाव पठार, सिध्दीविनायक कॉलनी, नवनाथनगर परिसर |
| 16 | बिबवेवाडी, आंबेडकरनगर मार्केटयार्ड | बिबवेवाडी | बिबवेवाडी स.नं. ५७०, आंबेडकरनगर वसाहत |
| 17 | गुलटेकडी, डायसप्लॉट | बिबवेवाडी | फा.प्लॉट नंबर ४२९ डायसप्लॉट वसाहत |
| 18 | गुलटेकडी, मीनाताई ठाकरेनगर | बिबवेवाडी | गुलटेकडी फा. प्लॉट क्रमांक ४२७, मीनाताई ठाकरे वसाहत |
| 19 | बिबवेवाडी, अप्पर इंदिरानगर | बिबवेवाडी | बिबवेवाडी- स.क्र. ६४०पै., ६४८पै., ६५९पै., पैकी अप्पर इंदिरा नगर वसाहत, शिवरायनगर स.नं. 658पै. |
| 20 | बिबवेवाडी, स.नं.650 | बिबवेवाडी | बिबवेवाडी- स.क्र. ६४९, ६५०, ६५१, ६५२ पैकी आईमाता मंदिराचे पाठीमागे व परिसर |
| 21 | बिबवेवाडी, गुलटेकडी, ढोलेमळा झोपडपट्टी | बिबवेवाडी | बिबवेवाडी- ४३०, ४३० ए-१ ए-२, व ४३० बी |
| 22 | बिबवेवाडी, प्रेमनगर वसाहत | बिबवेवाडी | बिबवेवाडी- स.क्र. ६९० (पै) प्रेमनगर वसाहत |
| 23 | गुलटेकडी, शंकरशेठ रोड | बिबवेवाडी | गुलटेकडी, पॅनोरमा सोसायटी, कुमार पॅसेफिक मॉलजवळ, शंकरशेठ रोड |
| 24 | बिबवेवाडी, अनंत वसाहत, कोठारी ब्लॉक्स | बिबवेवाडी | बिबवेवाडी, अनंत वसाहत, कोठारी ब्लॉक्स परिसर |

| अ.क्र | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नांव | मनपा क्षेत्रीय कार्यालय | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| 25 | **बिबवेवाडी गावठाण** | **बिबवेवाडी** | **बिबवेवाडी गावठाण, संत सोसायटी, हुतात्मा बाबु गेनु स्कुल परिसर** |
| 26 | येरवडा, नागपूर चाळ | येरवडा - कळस - धानोरी | नागपूर चाळ वसाहत |
| 27 | येरवडा प्रभाग क्र. 6 | येरवडा - कळस - धानोरी | लूपरस्ता, जेल रस्ता, हॉट मिक्स प्लांट रस्ता. पुणे नगर रस्ता यामधील संपूर्ण भाग येरवडा गावठाण नवीन खडकी गावठाण. गणेश नगर, मदर तेरेसा नगर, लक्ष्मी नगर, सुभाषनगर. अशोकनगर, बालाजीनगर, कामराजनगर इत्यादी |
| 28 | येरवडा, आदर्श इंदिरानगर, आळंदी रस्ता | येरवडा - कळस - धानोरी | येरवडा, आदर्श इदिरानगर |
| 29 | **धानोरी चौधरीनगर** | **येरवडा - कळस - धानोरी** | **धानोरी स.नं. 29(पै) व 31(पै) चौधरीनगर, गोकुळनगर, मुंजोबा वस्ती परिसर** |
| 30 | **येरवडा ढेरे तलाव परिसर** | **येरवडा - कळस - धानोरी** | **येरवडा कै. केशवराव वि. ढेरे तलाव परिसर** |
| 31 | हडपसर. रामनगर | वानवडी - रामटेकडी | शारदाबाई लोंढे शाळा, स.नं.११० रामटेकडी. रामनगर मस्जिद परिसर टाकवस्ती |
| 32 | हडपसर. रामटेकडी | वानवडी - रामटेकडी | गुड शेफर्ड, कमिटी चर्च. अंधशाळा. विठ्ठलमंदिर परिसर. वाल्मीकी वस्ती, प्रथमा बिल्डिंग, एसआरएफ परिसर |
| 33 | हडपसर, गोसावीवस्ती, वैदूवाडी | वानवडी - रामटेकडी | वैदुवाडी, रिद्धी सिद्धी बिल्डींग परिसर, लक्ष्मी माता मंदिर परिसर, डायमंड बेकरी परिसर. ओंकार हॉस्पिटल परिसर, सिल्व्हर टॉवर परिसर |
| 34 | हडपसर, सय्यदनगर 1 | वानवडी - रामटेकडी | सय्यदनगर गल्ली क्रमांक 1अ ते 6अ सय्यद नगर रेल्वे गेट जवळील परिसर |
| 35 | हडपसर. सय्यदनगर 2 | वानवडी - रामटेकडी | आशियाना हॉल परिसर. गल्ली नंबर 8अ ते 28 अ. आशाबी रसूल मस्जिद परिसर |
| 36 | हडपसर. सय्यद नगर 3, गुलामअली नगर | वानवडी - रामटेकडी | कॅनरा बॅंक एटीएम परिसर, प्रथम अपार्टमेंट परिसर. जामा मस्जिद परिसर. नवजीवन नर्सिंग होम परिसर. कमल हॉस्पिटल परिसर. सय्यदनगर गल्ली क्रमांक १ब ते १५ब |

| अ.क्र | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नांव | मनपा क्षेत्रीय कार्यालय | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| 37 | हडपसर. गुलामअलीनगर | वानवडी - रामटेकडी, **हडपसर - मुंढवा** | गुलामअलीनगर मधील सर्व गल्ल्या, युसुफिया मस्जिद परिसर आयडियल इंग्लिश मीडियम प्राइमरी स्कूल परिसर, गरीब नवाज मस्जिद परिसर |
| 38 | कोंढवा खुर्द शिवनेरी नगर | वानवडी - रामटेकडी | कोंढवा खुर्द गावठाण परिसर, श्रीहंसनगर परिसर, श्रीहंसनगर गल्ली क्रमांक 1 ते 36, पर्ल ड्रॉप स्कूल परिसर |
| 39 | कोंढवा खुर्द भाग्योदयनगर | वानवडी - रामटेकडी | भाग्योदयनगर, कोंढवा रस्ता, उत्तरेस: भाग्योदयनगर रस्ता दक्षिणेस: शितल पेट्रोल पंप परी पश्चिमेस: बंधननगर परिसर उमर परिसर साहिल मस्जिद परिसर |
| 40 | कोंढवा खुर्द तांबोळी बाजार | वानवडी - रामटेकडी | मिठानगर परिसर. गगन इम्राल्ड सोसायटी परिसर, अल नूर मस्जिद परिसर, अक्षर धाम सोसायटी परिसर, माउंट हेवन सोसायटी परिसर, पश्चिमेस : महाराष्ट्र ट्रस्ट एज्युकेशनल ट्रस्ट कॉलेज एज्युकेशन ट्रस्ट मिठानगर गल्ली क्रमांक १ ते १८ |
| 41 | कोंढवा खुर्द मिठानगर | वानवडी - रामटेकडी, **कोंढवा - येवलेवाडी** | पूर्वेस: भैरीबा नाला व कोंढवा रस्ता, पश्चिमेकडील युनिटी पार्क को. ऑप. सोसायटी व रस्ता, उत्तरेस : अशोका म्युज सोसायटी, दक्षिणेस : अश्रफनगर परिसर |
| 42 | **वानवडी, एस.आर.पी.एफ.** | **वानवडी - रामटेकडी** | **वानवडी एसआरपीएफ क्र. 1 व 2, नानावटीनगर** |
| 43 | **हडपसर, गोसावी वस्ती** | **वानवडी - रामटेकडी** | **हडपसर, स.नं. 106ए(पा), गोसावी वस्ती, पुणे सोलापुर रस्ता कॅनॉललगत परिसर** |
| 44 | शिवाजीनगर रेल्वे स्टेशन दक्षिणेकडील वसाहत | शिवाजीनगर - घोलेरोड | शिवाजीनगर रेल्वे लाईन दक्षिणेकडील वसाहत फायनल प्लॉट क्र ११,२३,२४,२५,२६, २९ पै. शिवाजीनगर |
| 45 | शिवाजीनगर, कामगार पुतळा | शिवाजीनगर - घोलेरोड | शिवाजीनगर कामगार पुतळा वसाहत, जुना तोफखाना, राजीव गांधीनगर |
| 46 | शिवाजीनगर, महात्मा गांधी झोपडपट्टी | शिवाजीनगर - घोलेरोड | महात्मा गांधी वसाहत- शिवाजीनगर- पाटकर प्लॉट, महात्मा गांधी नगर (फायनल प्लॉट क्र ६७) |
| 47 | शिवाजीनगर, पाटील इस्टेट | शिवाजीनगर - घोलेरोड | पाटील इस्टेट- पाटील इस्टेट वसाहत फायनल प्लॉट क्र ६५+६६ शिवाजीनगर |
| 48 | शिवाजीनगर रेल्वे लाईन उत्तरेकडील बाजू | शिवाजीनगर - घोलेरोड | शिवाजीनगर रेल्वे लाईन उत्तरेकडील विष्णुकृपा नगर फायनल प्लॉट क्र २९ पै. शिवाजीनगर |

| अ.क्र | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नांव | मनपा क्षेत्रीय कार्यालय | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| 49 | शिवाजीनगर, कामगार आयुक्त कार्यालयालगतची झोपडपट्टी | शिवाजीनगर - घोलेरोड | भोसलेवाडी, वाकडेवाडी, फा.प्लॉट क्र. ५८ पैकी व ५९ पैकी |
| 50 | **येरवडा, शक्ती अपार्टमेंट,लोकशाहिर अण्णाभाऊ साठेनगर,** | **शिवाजीनगर -** घोलेरोड | **येरवडा, शक्ती अपार्टमेंट आणि लोकशाहिर अण्णाभाऊ साठेनगर, संगमवाडी परिसर** |
| 51 | **येरवडा, सिध्दार्थनगर, रामवाडी** | **नगररोड - वडगावशेरी** | **येरवडा, सिध्दार्थनगर, रामवाडी जकात नाका लगतचा परिसर,** |
| 52 | **येरवडा, व्हाईट हाऊस सोसायटी** | **नगररोड - वडगावशेरी** | **येरवडा व्हाईट हाऊस सोसायटी परिसर** |
| 53 | **वडगाव शेरी** | **नगर रोड - वडगावशेरी** | **वडगाव शेरी, साईकृपा सोसायटी, विठ्ठलनगर, दिगंबरनगर** |
| 54 | येरवडा गांधीनगर - 1 | **नगर** रोड - **वडगावशेरी** | स.नं. १०३ येरवडा जयप्रकाशनगर, गांधीनगर |
| 55 | येरवडा गांधीनगर 2 | **नगर** रोड - **वडगावशेरी** | स.नं. १०३ पैकी गांधीनगर, येरवडा क्षेत्रीय कार्यालय पश्चिमेस |
| 56 | **पर्वती जनता वसाहत** | **सिंहगड रोड** | **पर्वती पायथा - जयभवानीनगर, जनता वसाहत परिसर** |
| 57 | **धायरी,रायकर मळा परिसर** | **सिंहगड रोड** | **शिवप्रथमेश सोसायटी, पांडव साम्राज्य, स.नं. 75पै., 161पै., रायकर मळा परिसर, धायरी, पुणे** |
| 58 | हडपसर, चिंतामणीनगर, रेल्वे गेटजवळ | हडपसर - मुंढवा | सय्यदनगर मगर पेट्रोल पंपाजवळील परिसर, संत तेरेसा चर्च परिसर, एचडीएफसी बॅंक एटीएम परिसर, मारुती मंदिर परिसर |
| 59 | हडपसर, आदर्शकॉलनी | हडपसर - मुंढवा | गजानन कॉलनीमधील सर्व सहा गल्ल्या, आयसीआयसीआय बॅंक (एटीएम) परिसर, हॉटेल संग्राम परिसर, अंजुमन खैरुल इस्लाम परिसर |
| 60 | **फुरसुंगी, भेकराईनगर** | **हडपसर - मुंढवा** | **फुरसुंगी स.नं. 175, 176, 177, 178, वाडी 178पै, 204, 206, 207 भेकराईनगर परिसर** |
| 61 | कोंढवा बुद्रूक काकडेवस्ती | कोंढवा - येवलेवाडी | पश्चिमेस: आई माता मंदिर ते कोंढवा बुद्रुक जाणारा रस्ता,<br>उत्तरेस ईशा पर्ल सोसायटी रस्ता,<br>दक्षिणेस : रीषा एनक्लेव इमारत रस्ता,<br>पूर्वेस: हॉटेल रुचिरा फूड परिसर साई कुंज |

| अ.क्र | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नाव | मनपा क्षेत्रीय कार्यालय | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| 62 | कात्रज, खंडोबा मंदिर परिसर, साईनगर, कोंढवा बु।।, | कोंढवा - येवलेवाडी | खंडोबा मंदिर परिसर, कात्रज (स.नं. 17 व 18(पै.) ,इ.) साईनगर कोंढवा बु।। (स.नं. 59पै., 60पै., इ) परिसर |
| 63 | धनकवडी, बालाजी नगर | कोंढवा - येवलेवाडी | बालाजीनगर वसाहत, धनकवडी, स.न. २०, २१, २२, २३ मधील क्षेत्र, काशीनाथ पाटीलनगर, पवार हॉस्पिटल लेन |
| 64 | एरंडवणे, रजपुत विटभट्टी वसाहत | वारजे - कर्वेनगर | एरंडवणे, रजपुत विटभट्टी वसाहत, महादेव मंदिर परिसरालगत |
| 65 | कोथरुड, पोस्टमन कॉलनी, शास्त्रीनगर | कोथरुड - बावधन | कोथरुड, स.नं. 83पै, पोस्टमन कॉलनी, शास्त्रीनगर पौड रस्ता डाव्या बाजुचा परिसर |

शेखर गायकवाड
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका